# अनुसूचित जातीच्या विद्यार्थीनींना येणाऱ्या समस्या व उपाय

सुरेखा रामभाऊ शिंदे

**प्रास्ताविक :**

शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या, मानवाच्या सर्वांगीण विकासाची अत्यंत महत्त्वाची अशी प्रक्रिया आहे.या सर्व बाबींची जाणीव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना होती. म्हणूनच त्यांनी देशातील जी सर्व सामान्य जनता आहे त्यांना शिक्षण घेण्यास प्रेरीत केले. त्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून शाळा, महाविद्यालय स्थापन केले. प्राचीन काळी समाजव्यवस्थेमध्ये समाजातील विशिष्ट वर्गांनाच शिक्षण घेण्याचा अधिकार होता. धर्म, शास्त्राचा आधार घेऊन अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या तसेच जो समाजातील घटक गावाबाहेर होता अशा घटकांना शिक्षण घेण्याचा कोणताही अधिकार नव्हता. 19 व्या शतकामधील समाजसुधारक चळवळींना काही प्रमाणात स्त्रिया व अनुसूचित जाती, जमातीच्या मुलींना शिक्षणाच्या मुळप्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला.

धनंजय किर यांच्या मते, महात्मा फुले म्हणतात की, एक पुरुष शिकला तर तो एकटाच शिकतो परंतु एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब शिकते. पर्यायाने सर्व समाज शिकतो त्यामुळे संपूर्ण राष्ट्रबलशाली बनते. राज्यघटनेनुसार सर्वांना शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला आहे. मागासवर्गीयसुद्धा शिक्षणापासून वंचित राहिले नाहीत. परंतु आज देखील अनुसूचित जातीतील मुली शिक्षणापासून दूर आहेत. म्हणावे तसे त्यांची शिक्षणात प्रगती झालेली नाही.

1958 च्या शैक्षणिक धोरणानुसार सरकारच्या सर्व शैक्षणिक संस्था सर्व जातीच्या लोकांसाठी खुल्या राहतील. त्यामुळे अनूसूचित जातीच्या विद्यार्थीनींना प्राथमिक शिक्षणाचे दरवाजे खुले झाले असले तरी ग्रामीण भागात अनुसूचित जातीच्या मुलींना दुय्यम दर्जा मिळतो. राष्ट्रपिता महात्मा फुले यांनी मुलींच्या शिक्षणाला प्रारंभ केला व शेतकऱ्यांच्या आसूड या आपल्या ग्रंथात प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व विशद केले आहे. अनुसूचित जातीच्या लोकांना शिक्षणाची पूर्वीपासूनच दुरावस्था होती. ह्या समाजातील लोकांनी शिक्षण घेणे म्हणजे सामाजिक गुन्हा समजला जात होता.

या बाबतीत बाबासाहेबांचे शैक्षणिक विचार मांडताना विजय खंडाळे म्हणतात, ''मागासलेल्यांना शिक्षण मिळत नाही. म्हणून शिक्षणविना ते गुलाम बनतात. म्हणून अस्पृश्यांची गुलामगिरी दूर होण्यासाठी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा त्यांचा मानस होता. सन 1948 मध्ये महात्मा फुले यांनी स्त्री-पुरुष समानतेच्या भूमिकेतून मुलींसाठी पहिली शाळा सुरु करून पाया रोवला तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्या ही पुढे जाऊन स्त्री शिक्षणाची इमारत पक्की केली. उज्वला जाधव-निकाळजे यांचे विश्लेषण करताना म्हणतात, ''स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य मिळाले तर तिचे कौटुंबिक व सामाजिक प्रतिष्ठा वाढते आणि ती स्वाभिमानी व स्वावलंबी बनते. या साठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या 15 व्या कलमानुसार स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. महात्मा फुले यांचा प्रागतिक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून डॉ.भिमराव आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या कलम 45 व 46 नुसार महिलांच्या शिक्षणाची तरतुद केली. तसेच कलम 14(4) व 16(4)

तसेच अनुसूचित जातीसाठी शिक्षण व नोकरीत मुलभूत अधिकार बहाल करण्यात आले आहेत. आजच्या समाजात बहु तांशी मागासवर्गीय समाज हा आर्थिक दुर्बल असून त्यात भारतीय व्यवस्थेत सामाजिक, मानसिक भेद लक्षात घेता मुलगा-मुलगी असा भेदभाव आपणास पहावयास मिळतो. याचा सर्वात जास्त परिणाम अनुसूचित जातीच्या विद्यार्थीनींना सहन करावा लागतो. डॉ.भिमराव आंबेडकरांना याची जाणीव पूर्वीपासूनच होती. डॉ.भिमराव आंबेडकरांनी 12 मार्च 1927 रोजी मुंबई विधानमंडळातील शिक्षण अनुदान विधेयक चर्चेत बोलताना म्हटले की, ''प्राथमिक शिक्षणाचा उद्देशच असा आहे की, एकदा मुलाने प्राथमिक शाळेत प्रवेश घेतला की, तो साक्षर होत नाही आणि उर्वरीत आयुष्यात साक्षर राहण्याची क्षमता विकसित करीत नाही तो पर्यंत त्याने प्राथमिक शाळा सोडू नये.'' बहिष्कृत वर्गातील शिक्षणविषयक उदासिनतेचे विश्लेषण करताना डॉ. भिमराव आंबेडकर म्हणतात की, या उदासिनतेचे कारण म्हणजे मुलगी शाळेत गेली तर घरचे काम कोण करणार दुसरे त्यांच्या शिक्षणासाठी खर्च करावा लागतो. तो वेगळाच अशा प्रकारे पालकांचा खर्च वाढतो.

डॉ.भिमराव आंबेडकरांच्या मते, हे जरी खरे असले तरी भविष्याच्या दृष्टीने घातक आहे. म्हणून मुलींनी देखील शिक्षित होणे व समाजातील राष्ट्रातील निरक्षरता कमी करणे अत्यंत महत्वाचे आहे.

**अनुसूचित जातीच्या विद्यार्थीनींच्या समस्यांचे स्वरुप :**

समाजातील इतर प्रवर्गापेक्षा अनुसूचित जातीच्या विद्यार्थीनींना येणाऱ्या समस्यांचे स्वरुप हे भिन्न आहे याचे कारण म्हणजे अनुसूचित जातीमध्ये असलेली निरक्षरता, कुटूंबाचा आर्थिक स्तर हा निम्न मध्यमवर्गीय अथवा दारिद्र्य देषेखालील उत्पन्नाचा असतो. अशा वेळी आई-वडील दोघांनाही उदर निर्वाहासाठी कामावर जावे लागत असल्यामुळे घर कामाची, स्वयंपाकाची, लहान भावंडांना सांभाळण्याची जबाबदारीही शाळा सोडून घरी बसविलेल्या मुलीवर असते. अनुसूचित जातीच्या विद्यार्थीनींना येणाऱ्या समस्यांचे स्वरुप हे आणखी एकाबाबतीत भिन्न आहे. शहरी तसेच ग्रामीण भागात हा घटक मुख्यप्रवाहातून नेहमीच विभक्त राहिला आहे. ह्या समस्यांचे विश्लेषण करताना डॉ.प्रशांत पगारे म्हणतात, ''शासकीय यंत्रणा व सेवाभावी संस्थांनी हातात हात घालून चालल्याशिवाय संपूर्ण साक्षरता होणार नाही.''

स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण कमी असण्याची कारणे नवीन नाहीत. मुलींना घरकाम, घरच्या जबाबदाऱ्या सांभाळायला लावण्याकडे मोठा कल आहे. मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टिकोन अजूनही बदललेला नाही असे या क्षेत्रातील अभ्यासकांचे मत आहे.

शहरी भागात अनुसूचित जातीच्या विद्यार्थीनींना मोफत पाठ्यपुस्तके, सकस आहार योजना राबवूनही शाळा गळतीचे प्रमाण अधिक आहे. या बाबतीत अधिक सखोल संशोधनाची आवश्यकता आहे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थीनींना येणाऱ्या समस्यांचे स्वरुप हे विभाग निहाय भिन्न आहे. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद यासारख्या महानगरातील विद्यार्थीनींच्या समस्यांपेक्षा निम, शहरी व ग्रामीण भागातील अनुसूचित जातीतील विद्यार्थीनींच्या समस्यांचे स्वरुप वेगळे आहे.

भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्कृष्ट संविधान असून त्यामध्ये समानतेची संकल्पना मान्य करण्यात आली आहे.

''भारताच्या राज्यघटनेत स्त्री व पुरुष दोघांनाही समानतेच्या पायावर उभे केले आहे. कलम 34 प्रमाणे कायद्यासमोर प्रत्येक पद समान आहे.'' अनुसूचित जातीच्या विद्यार्थीनींना भेडसावणाऱ्या शैक्षणिक समस्या

ह्या आर्थिक, सामाजिक व कौटूंबिक पातळीवर भिन्न आहेत. ह्या सर्व समस्यांच्या पाठीमागे मुख्य कारण म्हणजे अनुसूचित जातीतील समाजात असलेली निरक्षरता होय. निरक्षर व्यक्ती आपला व आपल्या कुटूंबातील सदस्यांचा विकास करु शकत नाही.

त्यामुळे खऱ्या अर्थाने भारतीय राज्यघटनेने दिलेला सर्वांना शिक्षण हा अधिकार खऱ्या अर्थाने वास्तवात आणावे त्यासाठी संशोधिकेने त्यावर प्रकाश टाकण्याचा केलेला छोटासा प्रयत्न होय.

**सारांश :**

या प्रवर्गातील विद्यार्थीनींच्या समस्यांवर उपाययोजना अमलात आणण्यासाठी विविध आयोगाची व समित्यांची स्थापना करुन त्यावरील अहवाल मिळविण्यात आले आहे. त्यातील प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे-

1. शाळा सुधार परिषदेची स्थापना करावी.
2. सर्व भागामध्ये शाळांची स्थापना करावी.
3. पूर्व प्राथमिक शाळांची मोठ्या प्रमाणात निर्मिती करावी.
4. शाळेची इमारत चांगली व दर्जेदार असावी.
5. शाळेचे काम विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासारखे असावे.
6. शाळेत स्त्री-शिक्षकांची नियुक्ती करावी.
7. शाळेत स्त्री-शिक्षकांना विशेष उत्तेजन द्यावे.
8. शाळेत अर्धवेळ नोकऱ्यांची संधी उपलब्ध करुन द्यावी.
9. स्त्री शिक्षकांना जवळच्या ठिकाणी नियुक्ती द्यावी.

अशा प्रकारच्या शिफारशी शाळा गळतीचे प्रमाण कमी व्हावे म्हणून त्या समितीने सुचविल्या आहेत.

**उपाययोजना :**

1. अनुसूचित जातीच्या मुलींना अधिकाधिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन द्याव्या.
2. अनुसूचित जातीच्या कुटूंबाचे उत्पन्न वाढविण्यासाठी विशेष उपक्रम राबवावेत.
3. अनुसूचित जातीतील मुलींसाठी नोकरीत विशेष आरक्षण असावे.
4. अनुसूचित जातीतील मुलींसाठी प्रवासात विशेष सवलत द्यावी.
5. अनुसूचित जातीतील विद्यार्थीनीसाठी वस्तीगृह उभारावेत.
6. अनुसूचित जातीतील विद्यार्थीनी करिता शैक्षणिक साहित्य खरेदी करताना विशेष सवलत द्यावी.

**संदर्भसूची :**


1. किर, ध. (1989).महात्मा फुले यांचे समग्र वाङ्मय. मुंबई :पॉप्युलर प्रकाशन.
2. खंडाळे, वि. (2011).डॉ. बाबासाहेब आंबेडकर पत्रकारिता :एक समाजशास्त्रीय विश्लेषण, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद
3. आंबेडकर, बी. आर. (2004), दलितांचे शिक्षण, क्षितिज पब्लिकेशन, नागपूर
4. पगारे, प्र. बी. (2009), दैनिक सकाळ, औरंगाबाद
5. सदावर्ते, यु. (2006), मराठवाडा आणि स्त्री शिक्षण, आदित्य प्रकाशन, नांदेड
6. पंडीत, बी. बी. (2005), शिक्षणातील संशोधन, नित्य नुतन प्रकाशन, पुणे
7. भितांडे, वि. रा. (2007), शैक्षणिक संशोधन, नित्य नुतन प्रकाशन, पुणे